आदेश

जा.क्र. पोआ/८४३० /२०२०
पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड
दिनांक :- २२.१२.२०२०

**विषय :- फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४(१)(३)प्रमाणे दिनांक २२.१२.२०२० ते दिनांक ०५.०१.२०२१ च्या दरम्यान रात्रौ २३.०० वा.ते पहाटे ०६.०० वा.पर्यंत संचार मनाई आदेश.**

१)ज्याअर्थी, कोरोना विषाणुचा प्रसार रोखण्यासाठीच्या उपाययोजनांचा भाग म्हणुन महाराष्ट्र शासनाच्या सुधारीत निर्देशानुसार महाराष्ट्र राज्य महसुल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत आणि पुर्नवसन, मत्रालय मुंबई- संदर्भ क्रं. महाराष्ट्र शासनाने आदेश नं. डीएमयु/२०२०/ सीआर.९२/ डीआयएसएम-१ दिनांक. २७ नोव्हेंबर २०२० अन्वये संपुर्ण राज्यात दिनांक ३१ डिसेंबर २०२० पर्यंत लॉकडाऊनची कालमर्यादा वाढवण्यासाठी मार्गदर्शक सुचना जारी करण्यात आले आहेत. तसेच संदर्भ क्रं. महाराष्ट्र शासनाने आदेश नं. डीएमयु/२०२०/ सीआर.९२/ डीआयएसएम-१ दिनांक. २१ डिसेंबर २०२० अन्वये राज्यातील महानगरपालिका क्षेत्रात अतिरिक्त निर्बंध लागु करणेत आले आहेत.

२)महाराष्ट्र शासन, राजपत्र असाधारण भाग -१ मध्ये उपविभाग यांचेकडील अधिसुचना क्र.३ मधील पान १९७३(II-१९७४) चे कलम २१ अन्वये पोलीस आयुक्त यांना विशेष प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी म्हणुन नियुक्त करुन क्रं.४ मधील फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चा क्रं.एमएससी १२७४/व्ही-एफ मधील आदेशाने फौजदारी दंड प्रक्रिया सहिंता न कलम १४४ चे विशेष अधिकार प्रदान केलेले आहेत.

३)त्याअर्थी, मी कृष्ण प्रकाश, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड तथा विशेष प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी म्हणुन शासनाच्या दि.०१/०४/१९७४ चे अधिसुचनेद्वारे प्राधिकृत अधिकारी म्हणुन पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रातील पिंपरी चिंचवड महानगर पालिका क्षेत्रासाठी परिच्छेद क्र.३ व ४ मधील आदेशातील तरतुदी व सवलतींच्या अधिन राहून फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम १४४ (१) (३) अन्वये **दि.२२/१२/२०२० ते दिनांक ०५/०१/२०२१ रोजी पर्यंत रात्रौ २३/०० वा. ते पहाटे ०६/०० वा. चे दरम्यान संचारबंदीचे आदेश लागू करत आहे. सदर आदेशात महाराष्ट्र राज्य शासन व महानगरपालिका पिंपरी चिंचवड यांनी वेळोवेळी पारीत केलेल्या आदेशाअन्वये देण्यात आलेल्या सवलती समाविष्ठ असतील.**

४)सदर आदेशाचे उल्लंघन करणारे व्यक्ती भारतीय दंड विधान संहिता कलम १८८, साथरोग अधिनियम १८९७ मधील तरतुदी व प्रचलित कायदद्यान्वये शिक्षेस पात्र राहील.

Scanned with CamScanner

५)उपरोक्त ठिकाणी सर्व संबंधितांना आदेशापुर्वी स्वतंत्र नोटीस बजावणे शक्य नसल्याने फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४(२) अन्वये प्राप्त अधिकारानुसार सदरचा आदेश एकतर्फी काढण्यात आलेला आहे याबाबतची माहीती प्रसारमाध्यमे, पोलीस स्टेशन, सहा.पोलीस आयुक्त तसचे परिमंडळीय पोलीस उपायुक्त कार्यालय यांचे नोटीस बोर्डवर नागरीकांचे सुविधेसाठी उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

सदरचा आदेश हा माझ्या सही शिक्क्यानिशी आज दिनांक२२.१२.२०२० रोजी दिलेला आहे.

(कृष्ण प्रकाश)
पोलीस आयुक्त,
पिंपरी चिंचवड

**ठिकाण :-** पिंपरी चिंचवड
दिनांक :-२२.१२.२०२०

Scanned with CamScanner